# जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, बुलडाणा

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, बुलडाणा अंतर्गत राबविण्यात येत असलेल्या योजनांची माहिती

## महाराष्ट्र राज्य ग्रामीण जिवनोन्नती अभियान (SRLM) अभियांनातील महत्वाचे घटक:-

१) संवेदनशील सहायक संरचना :- जिल्हा, तालुका व क्लस्टर पातळीवरील समर्पित झाली. संवेदनशिल कर्मचारी वृदांना यंत्रणा कार्यन्वीत करणे.

२) सर्व समावेशक सामाजिक सहभाग :- प्रत्येक दारिद्रय रेषेखालील कुटूंबातील किमान १ सदस्यांचा बचत गट तयार करणे, उपजिवीकेच्या पुर्ततेसाठी उत्पादक गट सेवा पुरवठा गट शेतीजन्य गट करण्यात येईल.

३) दारिद्रय रेषेखालील स्वरोजगारीच्या संस्थांचे उन्नतीकरणे :- लोकांच्या संख्या उदा:- स्वयंसहायता गट त्यांचे नांव जि.प.सर्कल तालुका व जिल्हा पातळीवर संघ स्थापन करणे त्यांच्या मार्फत कुटूंबापर्यत सामाजिक व आर्थिक सेवा पुरविणे.

४) मागणी आधारित योजना :- शासनाची भुमिका फक्त मदत कर्त्याची

५) प्रशिक्षण व क्षमता बांधणी :- गरिबांच्या संस्था, पत व्यवस्था,जीवनमान यांच्या सुयोग्य नियोजनासाठी व्यवस्थापकीय प्रशिक्षण व व्यवसायासाठी कौशल्यवृध्दी प्रशिक्षण देणे.

६) सर्व समावेशक आर्थिक सेवा अंतर्भाव.

७) व्याज दरामध्ये अनुदान :- केंद्र शासनाकडुन स्वयंसहायता बचत गटांना बँक व्याजदर व ७% व्याजदर, यातील तफावतीऐवढे व्याज अनुदान अनुज्ञेय आहे.

८) फिरता निधी व क्षमता बांधणी निधी

९) मुलभुत सुविधा व विपणनन सहायक.

१०) तरुणांना वेतनी रोजगाराधारीत प्रशिक्षणासाठी विशेष प्रकल्प

११) R-Seti ग्रामीण तरुणांना स्वयंरोजगारासाठी प्रशिक्षण

# इंदिरा आवास योजना :-

**उद्देश :-**

१) दारीद्रय रेषेखालील बेघर लोकांना निवारा उपलब्ध करुन देणे व त्यांचे राहणीमान उंचावण्यास मदत करणे बाबत.

२) प्राप्त उद्दीष्टांच्या ६०% अनुसुचित जाती/जमाती साठी व ४०% इतर लाभार्थी त्यापैकी १५% अल्पसंख्यांक लाभार्थी व ३% अपंग लाभार्थ्यांना लाभ.

३) घरकुलांचे बांधकाम २६९ चौ.फुट करणे आवश्यक यात शौचालय व निर्धुर चुली बसविणे आवश्यक

४) घरकुल बांधण्यासाठी लाभार्थीकडे स्वत:ची /शासकीय जागा असणे आवश्यक आहे.

**योजनेसाठी पात्र लाभार्थी :-**

१) लाभार्थी हा दारीद्रय रेषेखालील कुटूंबातील असावा.

२) लाभार्थीची निवड दारीद्रय रेषेची सर्वेक्षणाच्या आधारे तयार केलेल्या यादीतील बेघरांच्या मंजुर कायम स्वरुपी प्रतिक्षा यादीत समाविष्ट असावा.

३) यापुर्वी सादर योजनेच्या लाभ घेतलेल्या नसावा.

**अनुदान व फायदे :-**

सदर योजना केंद्र पुरस्कृत योजना या योजनेअंतर्गत केंद्र शासनाकडुन ७५% अनुदान व राज्य शासनाकडुन २५% अनुदान प्राप्त होते. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार घरकुलांची किंमत रु.४५०००/- प्रति घरकुल निश्चित करण्यात आलेली आहे.

तथापी महाराष्ट्र शासनाकडुन घरकुलासाठी अतिरिक्त राज्य हिस्सा रु.३५०००/- उपलब्ध करुन देण्यात येते. नविन घरकुलांसाठी एकुण ६८५००/- अनुदान लाभार्थ्यास घरकुल बांधकामासाठी उपलब्ध करुन देण्यात येते.

# रमाई आवास योजना

## उद्देश :-

१) दारीद्रय रेषेखालील अनुसूचित जातीच्या बेघर लोकांना निवास उपलबध करुन देणे व त्यांचे राहणीमान उंचावण्यास मदत करणे्

२) घरकुलांचे बांधकाम २६९ चौ.फुट करणे आवश्यक यात शौचालय व निर्धुर चुली बसविणे आवश्यक

३) घरकुल बांधण्यासाठी लाभार्थीकडे स्वत:ची जागा असणे आवश्यक आहे.

## योजनेसाठी पात्र लाभार्थी :-

१) लाभार्थी हा दारीद्रय रेषेखालील अनुसूचित जातीच्या कुटूंबातील असावा.

२) घरकुल बांधकामासाठी स्वत:ची जागा असावी.

३) कच्चे/कुडाचे घर असलेला असावा.

४) लाभार्थीची निवड दारीद्रय रेषा कुटुंब गणना सर्वेक्षणाच्या आधारे तयार केलेल्या बेघरांच्या मंजुर कायमस्वरुपी प्रतिक्षा यादीमधुन करण्यात येते.

५) यापुर्वी सदर योजनोचा लाभ घेतलेला नसावा.

## अनुदान व फायदे :-

सदर योजना राज्याचे निधीतुन राबविण्यात येते. १००% अनुदान राज्य शासनाकडुन देण्यात येते. याकरीता इंदिरा आवास योजनेच्या धर्तीवर लाभार्थींना रु.७००००/- अनुदान देय आहे. सदर योजनेतुन दारीद्रय रेषेखालील अनुसूचित जातीचे कुटूंबांना घरकुलांचा लाभ देण्यात येतो.

## राजीव गांधी ग्रामीण निवारा योजना क्र.१

सदर योजना ही राज्य शासनाचे गृहनिर्माण विभागाची यंत्रणा आहे. यामध्ये इंदिरा आवास योजनेचे दारीद्रय रेषेखालील समाविष्ठ यादीमधुन लाभार्थीची निवड करावयाची असते. ही संपुर्ण योाजना इंदिरा आवास योजनेच्या धर्तीवर असुन यासाठी इंदिरा आवास योजनेप्रमाणे लाभार्थीस रु.६८५००/- अनुदान अधिक रु.१५००/- लाभार्थी हिस्सा असे एकुण रु.७००००/- चे घरकुल आहे.

## राजीव गांधी ग्रामीण निवारा योजना क्र.२

सदर योजना दारीद्रय रेषेवरील परंतु रु.९६०००/- चे आतील उत्पन्न गटातील लाभार्थीसाठी घरकुल बांधुन देण्याची योजना आहे. या मध्ये रु.९००००/- बँकेचे कर्ज + रु.१००००/- लाभार्थी हिस्सा असे रु.१०००००/- चे घरकुल आहे. कर्जाची रक्कम लाभार्थीने ९ वर्षात फेडावयाची असुन व्याज राज्य शासन भरणार आहे.